युनिक वेचे

# निवड - भारत आणि ब्राझील मतदाराची

शोभन सक्सेना





रुचीर शर्मांची बरीचशी ख्याती एका मिथकावर आधारित आहे. गुंतवणूक बँकिंग क्षेत्राशी संबंधित असलेले हे गृहस्थ जागतिक राजकारण व अर्थकारणाचे तज्ज्ञ म्हणून मिरवतात. जून २०१४ मध्ये फुटबॉल विश्वचषक स्पर्धा चालू असताना मॉर्गन स्टॅनली मध्ये गुंतवणुकीचे व्यवस्थापक असलेल्या शर्मांनी टाईम्स ऑफ इंडियात एक धारिष्ट्यपूर्ण मात्र अडाणी लेख लिहिला. या लेखात शर्मांनी असे प्रतिपादन केले की विश्वचषक स्पर्धेसंबंधी ब्राझीलमध्ये असलेल्या जनक्षोभामुळे ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या ब्राझीलियन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष दिलमा रूयुसुफ यांचा पराभव अटळ आहे. शर्मा यांनी या लेखात असे मत व्यक्त केले की ब्राझीलने बदलासाठी टाहो फोडला आहे. व त्यामुळे ब्राझीलमध्ये नरेंद्र मोदींसारख्या नेत्याचा उदय ऑक्टोबरच्या निवडणुकीत होणार. शर्मांचा हा लेख जागतिक वित्तीय सत्ताकेंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसारित केला गेला. या लेखात शर्मा म्हणतात की भारत व ब्राझील एकाच सामायिक तालावर डोलतात. ते पुढे असे म्हणतात की राष्ट्रकुल स्पर्धा भारतात एक विस्मयकारी यशस्वी आयोजन म्हणून पाहिली गेली, मात्र त्यांच्या आयोजनातील भ्रष्टाचारामुळे शासनविरोधी बंड पेटले. त्यामुळे सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा मेच्या संसदीय निवडणुकीत दारुण पराभव झाला. ब्राझीलमध्येदेखील असेच काहीसे घडत आहे. मग शर्मांनी असेही भाकीत केले की सत्ताबदलाची अपेक्षा असणारे अनेक ब्राझिलियन भारताकडे एक आदर्श उदाहरण म्हणून पाहतात. तिथे, अर्थकारणाच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे सत्ताधारी काँग्रेस पक्षाबाबतची चीड निर्माण झाली त्यामुळे मे २०१४ मध्ये पार पडलेल्या निवडणुकीत नरेंद्र मोदींचा विजय झाला. मोदींची ख्याती अशी की ते एक पोलादी पुरूष आहेत कार्यनिपुण शासन चालवतात. ब्राझीलमध्ये गुंतवणूक करणारे पाहत आहेत की शेअरमार्केट मोदींच्या विजयामुळे वधारले आहे अन् अपेक्षा करत आहेत की ब्राझीलमध्ये विरोधकांच्या विजयामुळे

भारतासारखेच घडेल.

ब्राझीलमधील विरोधकांमध्ये अग्रगण्य आहेत एईशिओ नेवीस (AN) जे काहीसे मोदींसारखे ब्राझीलच्या एका प्रांताचे राज्यपाल आहेत व त्यांच्या कार्यनिपुणतेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांचे अर्थमंत्री असणार आहेत अरमिनिओ फ्रागा जे १९९० च्या दशकात एका अशा समितीचे महत्त्वपूर्ण सदस्य होते ज्या समितीने झपाट्याने होणारी चलनवाढ आटोक्यात आणली होती. आज ब्राझीलमधील अनेक उद्योगपती उघडपणे चिंता व्यक्त करत आहेत की शासनाचा पैसा चुकीच्या पद्धतीने खर्च केल्याने ब्राझील पुढचा व्हेनेझ्युएला बनत आहे.

**खोटे ठरलेले भाकित**

ब्राझीलच्या निवडणुकांचे निकाल जेव्हा प्रत्यक्षात घोषित झाले तेव्हा स्पष्ट झाले की शर्मांचे भाकीत खोटे ठरले आहे. शर्मांनी प्रतिपादन केले होते की अर्थकारणाचे चुकीचे व्यवस्थापन व फुटबॉल विश्वचषक स्पर्धांमध्ये ब्राझीलच्या पराभवामुळे निर्माण झालेल्या जनक्षोभामुळे ब्राझील अध्यक्षांचा पाडाव अटळ आहे. मात्र, न्यूयॉर्कमधील एका प्रथितयश वित्तीय संस्थेचे व्यवस्थापक असलेल्या शर्मांचे भाकीत सपशेल खोटे ठरले. प्रत्यक्षात दिलमा रूयुसुफ ज्या वर्कर्स पार्टीच्या उमेदवार होत्या, त्यांना ५२% मते मिळाली तर नेवीस जे सोशल डेमॉक्रेटिक पार्टी ऑफ ब्राझील (पक्षाचे नाव चकवणारे आहे!) चे उमेदवार होते, त्यांना ४८ टक्के मते मिळाली. नेवीस ज्या मिनास गेरियास प्रांताचे राज्यपाल होते, त्या प्रांतात देखील रूयुसुफ यांना नेवीस यांच्यापेक्षा जास्त मते मिळाली (हे म्हणजे मोदींचा गुजरातमध्ये पराभव होण्यासारखे).

शर्मांची भाकिते अपेक्षेप्रमाणेच होती. हे भाकीत वॉल स्ट्रीटवर कार्यरत असणाऱ्या एका ठगाचे भाकित होते ज्यांच्यासाठी देश म्हणजे बाजारपेठा आहेत. असे देश उद्योगांशी मैत्र असलेली शासने चालवतात. शर्मासारख्यांसाठी समाजकल्याणासाठी शासनांनी पैसा खर्च करणे गैर आहे, चूक आहे. शर्मांच्या लेखाची मध्यवर्ती कल्पना साधी आहे. समाजवादी धोरणे राबवण्याची किंमत रूयुसुफ शासनाला चुकवावीच लागणार अन् वेळ आलेली आहे की ब्राझीलने तेच करावे जे भारताने मे महिन्यात केले व एक उद्योगांशी मैत्र असलेला अध्यक्ष निवडावा.

ही निवडणूक ब्राझीलने एक नवा अध्यक्ष निवडावा एवढ्यापुरतीच मर्यादित नव्हती तर देशाची भावी दिशा ठरवण्यासाठी देखील महत्त्वाची होती. एकीकडे रूयुसुफ होत्या ज्या शेअरमार्केट मध्ये अप्रिय आहेत कारण त्या रोजगारांना सुरक्षा पुरवतात व समाजकल्याणाच्या योजना विस्तारत राहतात. दुसरीकडे नेवीस होते जे ब्राझीलीयन उद्योगपतींच्या वर्तुळात अत्यंत लोकप्रिय आहेत अन् ज्यांच्याबाबत अपेक्षा आहे की ते ब्राझीलीयन अर्थकारण मुक्त करतील. एका अर्थाने ही निवडणूक अनेक अर्थ संदर्भांनी भारतीय निवडणुकीसारखी होती.

**भारताच्या पावलावर पाऊल**

उण्यापुऱ्या एका वर्षापूर्वी ब्राझील भारताच्या मार्गावर निघाला होता. २०११ च्या अण्णा हजारे चळवळीसारखा जून-जुलै २०१३ मध्ये ब्राझिलच्या रस्त्यांवर देखील जनक्षोभ अवतरला. पण ब्राझीलच्या निदर्शनांचे नेतृत्व हजारेंसारख्या कुणीच केले नव्हते, मात्र ब्राझीलमधील क्रांतिकारींचे व्यक्तित्व भारतीय वसंता (Indian Spring) सारखेच होते. पाश्चिमात्य प्रसारमाध्यमे रूयुसुफ सरकारविरुद्ध जबरदस्त असंतोषाच्या कथांनी भरून वाहत होती. असे असताना, ब्राझीलमधील सर्वात मोठी बाजार सर्वेक्षण संस्था, डाटाफोलाने केलेल्या पाहणीनुसार ब्राझीलमधील निदर्शनांचे उच्चभ्रू स्वरूप लवकरच स्पष्ट झाले. निदर्शकांपैकी ७७% उच्चशिक्षित होते. ७१% पहिल्यांदाच निदर्शने करत होते अन् जवळजवळ ९०% श्वेतवर्णीय होते (ब्राझीलच्या लोकसंख्येत श्वेतवर्णीयांचे प्रमाण ४०% आहे). शासनविरोधी मोर्चे शहरांमधील मध्यमवर्गीय वस्त्यांमध्ये आयोजित केले जात होते. बव्हंशी कृष्णवर्णीय, कामगार, व गरीब ब्राझीलियन जनता अशा वस्त्यांपासून बऱ्याच अंतरावर राहतात अन् त्यांच्या वस्त्यांमध्ये फारसे मोर्चे निघाले नाहीत.

शासनविरोधी मोर्चांमधील घोषणादेखील भारतातल्या घोषणांसारख्याच होत्या. ब्राझील बदला, मला माझा देश परत हवा आहे इत्यादी. भारतातल्यासारखेच गेल्या दशकातील आर्थिक वाढीचे फायदे ज्यांना झाले तेच मागणी करत होते की ब्राझीलची कार्यपद्धती बदलणे आवश्यक आहे. होणारी निदर्शने व त्यांचे प्रसारमाध्यमातील वार्तांकन पाहता कोणाचाही असा समज होऊ शकेल की ब्राझील एक अत्यंत गरीब राष्ट्र आहे. सत्य परिस्थिती नेमकी याच्या उलट आहे. ब्राझीलचे दरडोई उत्पन्न $ ९००० डॉलर इतके आहे. ब्राझीलने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला देय असलेली सर्व कर्जे फेडली आहेत, जीडीपी अन् देय यांचे प्रमाण घटले आहे, चलनवाढ

६ टक्क्यांच्या आसपास आहे, बोल्सा फॅमिली यासारख्या समाजकल्याण कार्यक्रमांमुळे ४ कोटी ब्राझीलियन दारिद्र्यातून बाहेर पडले आहेत. ब्राझीलच्या ४०० वर्षांच्या इतिहासात आजच्या इतके या देशाचे भले कधीच झाले नव्हते. मग निदर्शकांचा राग कशासाठी होता? वॉल स्ट्रीटवरील शर्मांसारखी धेंडे अर्थकारणाचे चुकीचे व्यवस्थापन निदर्शनांना जबाबदार होते असे मानतात. अर्थकारणाचे गैरव्यवस्थापन म्हणजे समाजकल्याणावरील वाढीव खर्च! मात्र देशाच्या आर्थिक वाढीचा उपयोग रूयुसुफ व त्यांच्या आधी अध्यक्ष लुला (२००३ ते २०१०) यांनी ब्राझीलमध्ये समताधिष्ठित समाज स्थापन करण्यासाठी केला. असा प्रयत्न या पूर्वी देशात कधीच केलेला नव्हता. त्यांच्या धोरणांमुळे ब्राझीलमधील गरिबांना (जे बहुतांशी कृष्णवर्षीय किंवा मिश्रवर्णीय आहेत) ब्राझीलच्या स्वप्नवत विकासात भाग घेण्याची संधी मिळाली. यामुळे देशातील जुनी सामाजिक व्यवस्था डळमळीत झाली. ब्राझीलमधील उद्योजक वर्ग सदैव तक्रार करत राहतो की ब्राझीलमधील कामगार कायदे जाचक आहेत अन् कामगारांना त्यामुळे बडतर्फ करणे अशक्य आहे. अण्णा हजारे आंदोलनासारखेच ब्राझीलियन वसंताचे आयोजन व नेतृत्व ब्राझिलियन आर्थिक वाढीचा सर्वाधिक फायदा झालेल्या उच्च व मध्यमवर्गाने केले. ब्राझिलियन गरीब मात्र ही नौटंकी मोठ्या शहरांलगत असलेल्या त्यांच्या वस्त्यांतून पाहत राहिले. (ब्राझीलमध्ये अशा झोपडपट्ट्यांना Favela म्हणतात.)

**सत्ताबदलाच्या मागण्या**

उच्चभ्रू निदर्शनकर्त्यांनी सत्ताबदलाच्या अभियानाचा पाया रचल्यानंतर, जागतिक वित्त बाजारपेठा, आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमे, ब्राझीलियन प्रसारमाध्यमे कामाला लागली. रूयुसुफ यांच्या वर्कर्स पार्टी विरुद्ध निवडणूक वर्षात म्हणजे २०१४ मध्ये या सर्वांनी जोरदार मोहीम उघडली. सत्ताधारी वर्कर्स पार्टी भ्रष्ट आहे अन् शासन व अर्थकारणाचे वाटोळे करत आहे असे आरोप लावले गेले. ब्राझील मतदानाला जात असतानाच (जागतिक वित्त भांडवलदारीचे समर्थन करणाऱ्या) The Economist या साप्ताहिकात ब्राझीलने रूयुसुफ यांना नाकारत नेवीस यांना का निवडावे, अशा आशयाचे संपादकीय छापून आले. Financial Times व इतर पाश्चिमात्य नियतकालिकांनी मे २०१४ च्या निवडणुकांपूर्वी जशी मनमोहनसिंग सरकारविरुद्ध मोहीम उघडली होती काहीशी तशीच मोहीम त्यांनी ब्राझील शासनाविरुद्ध उघडली.

शर्मासारख्यांनी लिहिलेल्या पटकथेबरहुकूम भारतात सर्व काही घडले. वॉल स्ट्रीट, पाश्चिमात्य व देशांतर्गत प्रसारमाध्यमांच्या संयुक्त हल्ल्याचा सामना संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला करावा लागला. या संयुक्त अविरत हल्ल्याच्या परिणामी शासनाने भारतीय अर्थकारणाचे अधिक विस्तृत उदारीकरण राबवतानाच सार्वजनिक खर्चांना कात्री लावण्यास सुरुवात केली. दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमे ब्राझील सरकारवर अधिकच संरक्षणात्मक असल्याची टीका करत असताना रूसुयुफ शासनाने अशा टीकेला शरण न जाण्याचे ठरवले. उलट, निवडणूक प्रचारादरम्यान रूसुयुफ यांनी स्पष्ट केले की ब्राझील आगामी वर्षांमध्ये आपल्या समाज कल्याण कार्यक्रमांची व्याप्ती वाढवणार, परिणामी त्यावरील खर्च वाढवणार. त्यामुळेच हा योगायोग नव्हे की जसजशी रूसुयुफांची लोकप्रियता वाढत गेली, तसतसे ब्राझिलियन शेअर्सच्या किमती घसरत गेल्या व ब्राझिलियन चलनाच्या तुलनेत अमेरिकन डॉलरची किंमत वधारत गेली.

**विलक्षण विजय**

वॉल स्ट्रीट लबाडांबरोबर सहकार्य न करण्याच्या रूसुयुफ यांच्या निर्णयामुळे त्यांना घवघवीत यश मिळाले व प्रतिस्पर्धी असलेल्या नेवीस यांच्यापेक्षा त्यांना तीस लाख मते अधिक मिळाली. हा विजय रूसुयुफ व त्या ब्राझीलीयन जनतेचा आहे. सामाजिक समता, न्यायसंगत आर्थिक वाढ व स्वतंत्र परराष्ट्र धोरणामध्ये विश्वास असणाऱ्यांचा आहे. मनमोहनसिंग यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षात भारतीय अर्थकारणाची अनेक क्षेत्रे परकीय भांडवली गुंतवणुकीसाठी मुक्त केली. रूसुयुफ यांनी सार्वजनिक खर्चांना कात्री लावत सिंग यांच्यासारखे केले असते तर शर्मांचे अघोरी स्वप्नरंजन खरे ठरले असते. म्हणजेच, नेवीस ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष बनले असते. शर्मा यांनी नेवीस व मोदी यांची तुलना करताना त्यांना कार्यनिपुण राज्यपाल ठरवले. मात्र असे करताना त्यांनी खरी तुलना दडवली. पाश्चिमात्य माध्यमांसाठी नेवीस एका मध्यममार्गी राजकीय पक्षाचे उद्योगमित्र नेते आहेत. वस्तुतः त्यांचा पक्ष हा उजव्या विचारसरणीचा पक्ष आहे, ज्याने या निवडणुकीत अत्यंत संयतपणे वंश या कोटीक्रमाचा वापर केला. असे करत असताना नेवीस यांच्या पक्षाने ब्राझीलीयन समाजातील

**(पान १८ वर)**

(शोभन सक्सेना / पान १५ वरून)

कृष्णवर्णीयांच्या उत्कर्षाच्या धमक्या देत, धाक दाखवत ब्राझीलच्या श्वेतवर्णीय, मध्यमवर्गीयांचे संघटन करण्याचा प्रयत्न केला. (भारतीय निवडणुकांमध्ये भाजपनेदेखील अशाच रीतीने आर्थिक वाढ अन् धार्मिक समुदायांच्या अस्मितांचा वापर केला होता. )

नेवीस राष्ट्राध्यक्ष झाले असते तर ब्राझील शासनाने सार्वजनिक खर्चामध्ये कपात केली असती व अमेरिकन उद्योगसमूहांसाठी ब्राझीलच्या अर्थकारणाचे उदारीकरण घडवून आणले असते. शर्मांना हेच हवे होते. टाईम्स ऑफ इंडियाच्या लेखात शर्मा यांनी आरमिनिओ फ्रागा यांचे वर्णन ब्राझिलियन अर्थकारणाला वठणीवर करणारा जादूगार असे केले आहे. रशिया टुडे या नियतकालिकात लिहिताना ब्राझीलियन पत्रकार पेपे एस्कोबार यांनी लिहिले आहे की, नेवीस अध्यक्ष बनले असते तर फ्रागा हेच अर्थमंत्री झाले असते. फ्रागा हे जॉर्ज सोरोस यांच्यासाठी उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये अति संवेदनशील गुंतवणूक निधी चालवतात आणि गुंतवणुकी लाभदायी व्हाव्यात यासाठी सक्रीय असतात. फ्रागा वॉल स्ट्रीटवर कार्यरत असणारे गिधाड आहे. ते अर्थमंत्रालयाचे नेतृत्व करणार म्हणजे ब्राझीलचे Macroeconomic धोरण या गुंतवणूक निधीने चालवण्यासारखे आहे. रूचीर शर्मा Morgan Stanley मध्ये व्यवस्थापक आहेत. रूसुयुफ यांच्या काल्पनिक पाडावाबाबत लिहीत असताना शर्मा, कदाचित याचेच भाकीत करत होते की असे व्हावे याचे कारस्थान करत होते एवढाच प्रश्न आता नीटपणे तपासण्याचा बाकी राहिला आहे.

●

(Scroll.in या वेबसाईटवर २७ नोव्हें. २०१४ रोजी प्रकाशित लेखाचा **विजय कुंजीर** यांनी केलेला अनुवाद)

लातूर प्रतिनिधी

**डॉ. उमाकांत जाधव**
भ्र. ८२७५५९९७७७